**<u>विशेष दिवाणी दावा क्र.७९/२०२० मधील नि.क्र.३६ वरील आदेश</u>**
(शितल फापाळे विरूध्द दत्तात्रय फापाळे)

प्रतिवादी क्रमांक ७ व ८ यांनी प्रस्तुतचा अर्ज त्यांना कैफियत दाखल करण्यास झालेला उशिर माफ करण्याची विनंती केलेली आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, कोरोना प्रादुर्भावामुळे त्यांना कैफियत दाखल करण्यासाठी आवश्यक व महत्वाची कागदपत्रे वेळेत उपलब्ध झाली नाहीत. त्यामुळे त्यांना कैफियत दाखल करणेस उशीर झालेला आहे. त्यांनी शेवटी अर्ज मंजुर करण्याची विनंती केली.

**०२.** वादींनी सदर अर्जावर म्हणणे देवून जोरदार हरकत घेतलेली आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, प्रतिवादींनी दिलेले अर्जातील कारण व किती दिवसाचा उशिर झाला हे नमूद नसल्याने अर्ज टेनेबल नाही. कैफियत दाखल करण्यासाठी किती दिवसाचा उशिर झाला याबाबतचे विवेचन अर्जात नाही. प्रतिवादींनी प्रत्येक दिवसाचा उशिराचे कारण विषद केलेले नाही. त्यांनी शेवटी अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली.

**०३.** अर्ज, म्हणणे व अभिलेखाचे अवलोकन केले. प्रस्तुतचा दावा वाटप व मनाई मिळणेकामी दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्रमांक ७ व ८ यांना दिनांक ०४/०१/२०२१ रोजी समन्सची बजावणी झालेली आहे. त्यांनी दाव्यात हजर होवून विहीत मुदतीत कैफियत दाखल केलेली नाही. प्रतिवादी क्रमांक ७ व ८ यांनी कैफियत दाखल करण्यास कोरोना प्रादुर्भावाचे कारण दिलेले आहे. कोरोना संसर्गामुळे न्यायालयीन व शासकीय कार्यालयातील कामकाज जवळजवळ बंद होते. प्रतिवादींनी कैफियत देण्यास उशिर झाल्याचे दिलेले कारण योग्य व संयुक्तिक असल्याचे दिसुन येते.

**०४.** प्रकरण स्थावर मिळकतीबाबत आहे. त्यामध्ये उभय पक्षकारांचे हितसंबंध गुंतलेले आहे. प्रतिवादींची कैफियत दाव्याचा निकाल गुणावगुणावर करण्यासाठी उपयोगी ठरणार आहे. प्रतिवादींना कैफियत दाखल करण्याची परवानगी नाही दिल्यास ते आपली बाजू सक्षमपणे न्यायालयासमोर मांडू शकणार नाही. त्यामुळे त्यांच्यावर अन्याय होवून त्यांचे कधीही न भरूण येणारे नुकसान होणार

आहे. याउलट, अर्ज मंजुर केल्यास वादींचे तितकेसे नुकसान होणार नाही. वरील विवेचनावरून मी न्यायाचे दृष्टीने खालील आदेश पारित करण्यात येतो :—

**आ दे श**

१. अर्ज निशाणी क्रमांक—३६ रुपये ३००/— (अक्षरी रक्कम रुपये) देण्याचे अटीवर मंजुर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्रमांक ७ व ८ यांना कैफियत दाखल करण्यास झालेला उशिर माफ करण्यात येतो.

Digitally signed by Vaibhav Kalyanrao Jadhav
Date: 2021.11.20 10:50:29 +0530

( वैभव क. जाधव )
५वे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर,
संगमनेर.

दिनांक :— १९.११.२०२१.